# ❖ निवेदन ❖

मी, या निवेदनाद्वारे जाहीर करतो की, **"बॅ. पी. जी. पाटील — जीवन आणि कार्य"** हा प्रबंध माझे संशोधन मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विजय नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वत: लिहिला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम्.फिल. पदवीसाठी सादर केला आहे. हा प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवीसाठी किंवा अन्य पदविकेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

ठिकाण : सातारा

दिनांक : १८-६-२००७.

**(संतोष हनुमंत जाधव)**

अभ्यासक

# ❖ प्रमाणपत्र ❖

प्रमाणित करण्यात येते की, श्री. संतोष हनुमंत जाधव यांनी इतिहास विषयातील एम्.फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे सादर करावयाचा **"बॅ. पी. जी. पाटील—जीवन आणि कार्य"** हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. श्री. जाधव यांनी लिहिलेला प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारीत आहे. हा प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवीसाठी किंवा अन्य पदविकेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

ठिकाण : सातारा

दिनांक : २८-६-२००७

**(प्राचार्य डॉ. विजय ना. नलावडे)**

मार्गदर्शक

# ❖ ऋणनिर्देश ❖

एम्. फिल. पदवीसाठी तयार केलेल्या **'बॅ. पी. जी. पाटील — जीवन आणि कार्य'** या शोध प्रबंधाचे काम पूर्ण होण्यासाठी अनेक व्यक्ती व संस्थांचे मला सहकार्य लाभले. तसेच अनेकांची या कामी मला प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष मदत मिळाली त्या सर्वांचा ऋणनिर्देश करणे ही औपचारिकता नसून ते माझे आद्यकर्तव्य आहे असे मी समजतो. कारण त्याशिवाय मी माझा हा अभ्यास पूर्ण करूच शकलो नसतो.

ह्या प्रस्तुत विषयाचा अभ्यास व या प्रबंधाचे लेखन करण्यासाठी माझे संशोधक मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विजय नलावडे यांनी मला प्रथम प्रेरणा दिली. मला माझ्या अभ्यासात त्यांचे वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन मिळाले. तसेच या प्रबंधासाठी डॉ. के. एच. शिंदे, प्राचार्य, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा तसेच माजी प्राचार्य के. एस. मोहिते यांनी प्रोत्साहन दिले. छत्रपती शिवाजी कॉलेज साताराचे माजी इतिहास विभागप्रमुख प्रा. एम. बी. पिसाळ, डॉ. शोभना जाधव यांनी वेळोवेळी दिलेली माहिती व डॉ. अरूण भोसले (इतिहास विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर), प्रा. बी. आर. कदम, प्रा. डॉ. एस. पी. शिंदे, प्रा. डॉ. टी. एस. पाटील, प्रा. व्ही. पी. पवार, प्रा. के. आर. वटाणे व इतिहास विभागप्रमुख प्रा. व्ही. एस. जाधव यांचेही सहकार्य लाभले. ह्या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. व्ही. एन. नलावडे यांच्या पत्नी प्रा. सौ. उज्वला नलावडे यांनी मला सदरच्या संशोधनाच्या कामात वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझ्या विषयाची उपयुक्त संदर्भ साधने छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा ग्रंथालय, कर्मवीर छाया, सातारा, तसेच बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय कोल्हापूर, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर, संत गाडगे महाराज कॉलेज कराड, डी. जी. कॉलेज सातारा येथील ग्रंथालयामधून व बॅ. पी. जी. पाटील वाचनालय सातारा इत्यादी ठिकाणी उपलब्ध झाली. वरील सर्व संस्थांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

हा लघुशोध प्रबंध लिहीत असताना अनेक मान्यवर व्यक्तींच्या मी मुलाखती घेतल्या. त्यामध्ये आदरणीय मा. एन. डी. पाटील, चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा, प्राचार्य आर. के. शिंदे, प्राचार्य आर. डी. गायकवाड, डॉ. एस. जी. फडके, प्राचार्य एम. एम. स्वामी, बी. जी. शेवाळे, प्राचार्य नारायणराव भगरे, ॲड. के. व्ही. पाटील, प्रा. सौ. व्ही. के. पाटील, प्रा. व्ही. एस. रोकडे, प्राचार्य एम. ए. शेख, मा. पांडुरंग पाटील (माजी जि. प. सदस्य, सांगली), मारूती तावदरकर, भारत पाटील, एम. जी. निकम यांचा समावेश होतो. त्या सर्वांनी मला बॅ. पी. जी. सरांच्या जीवनाबद्दल उपयुक्त माहिती दिली त्या सर्वांचा मी आभारी आहे.

माझे आजोबा स्व. किसन जाधव यांच्या आशिर्वादामुळे व आजी, तसेच आईवडील व भाऊ चंद्रकांत जाधव यांच्या प्रोत्साहानामुळे मी हा प्रबंध पूर्ण करू शकलो त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

माझे सहकारी मित्र प्रा. पी. जी. गायकवाड, अजितकुमार जाधव, आबासाहेब सरवदे, महादेव खवळे, एस. वाय. पाटील (सैनिक स्कूल शिक्षक), सुनिल पवार, सचिन माने, सचिन ओहोळ, राजेंद्र धायगुडे, श्रीकांत काटे, शहाजी जाधव, जावेद मुलाणी, विशाल खवळे, समाधान चव्हाण, सचिन बरडे, सुनिल जाधव, दादा शिंदे, अण्णा लेंडवे,

संजय सरतापे, लक्ष्मण मासाळ, विकास ताटे देशमुख, मनिषा भाळे, अनिता खाडे, किरण बोडके यांनी सहकार्य केल्याबद्दल तसेच माझे मित्र दत्तात्रय जाधव, अभयसिंह शिंदे, निलेश जाधव, पांडुरंग माने—देशमुख, बाळासाहेब जाधव, उत्तम जाधव यांनीही वेळोवेळी प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. छ. शिवाजी कॉलेज ग्रंथालयातील जाधव सर, लिपिक सी. आर. बर्गे, एम. जी. निकम व प्रा. एस. जी. गवस यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या प्रबंधाचे कॉम्प्युटर टायपिंगचे काम अल्फिया कॉम्प्युटर्सचे श्री. शेख यांनी अल्पावधीत सुबकपणे पूर्ण केल्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

स्थळ : सातारा

दिनांक :

**संतोष हनुमंत जाधव**

अभ्यासक

# ❖ प्रस्तावना ❖

शिवाजी विद्यापीठास एम्. फिल. पदवीसाठी **'बॅ. पी. जी. पाटील — जीवन आणि कार्य'** हा शोध प्रबंध सादर केलेला आहे. या विषय निवडीमागचे प्रमुख कारण असे की, आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात बॅ. पी. जी. पाटील यांचे कार्य अनमोल आहे. बॅ. पी. जी. पाटील यांच्या जीवनावर काही विचारवंतांनी लेख लिहिलेले आहेत, परंतु बॅ. पी. जी. पाटील यांच्या जीवनावर व कार्यावर संशोधक या नात्याने कोणीही लेखन केलेले नाही. त्यामुळे बॅ. पी. जी. पाटील यांचे जीवन सखोलपणे अभ्यासण्याची आणि त्यांच्या सामाजिक शैक्षणिक व प्रशासकीय कार्याची माहिती मिळविण्याची जिज्ञासा निर्माण झाली. म्हणूनच संशोधनाकरिता हा विषय निवडला आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात समाजसुधारकांच्या कार्याला अनन्यसाधारण स्थान आहे. त्यामध्ये म. फुले, छ. शाहू, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा सिंहाचा वाटा आहे. या सामाजिक कार्याचा आदर्श बॅ. पी. जी. पाटील यांनी पुढे ठेवून शिक्षण क्षेत्रात बहुमोल कार्य केले आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील हे बॅ. पी. जी. पाटील यांच्या कर्तृत्त्वाचा प्रेरणास्त्रोत ठरले. कर्मवीर आण्णांचे विचार, आचार आणि तत्वज्ञान बॅ. पी. जी. सर यांनी मनापासून कृतीत आणले. म्हणूनच त्यांना शिक्षण क्षेत्रातील अनेक दिग्गज पदांवर काम करण्याची संधी मिळाली. कर्मवीर आण्णांचा विचार त्यांनी शेवटपर्यंत सोडला नाही. अखेरपर्यंत ते समाजाच्या भल्यासाठीच झटत राहिले. शिक्षण क्षेत्रात तर सेवानिवृत्त होऊनही त्यांनी स्वेच्छेने सेवा केली. अशी स्वेच्छेने समाजाची सेवा करणारा रयतसेवक, शिक्षण क्षेत्रातील हजारो शिक्षकांपुढचा, विचारवंतांपुढचा आदर्श ठरावा इतपत त्यांचे कार्य महनीय आहे.

**"बॅ. पी. जी. पाटील – जीवन आणि कार्य"** या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेऊन माहिती मिळविली. या साधनांमध्ये काही प्रकाशित तर काही अप्रकाशित साधने उपलब्ध झाली. बॅ. पी. जी. पाटील दैनंदिन नोंदवही, पगारपत्रके, लग्नासाठी आलेल्या खर्चाची मांडणी, हस्तलिखित कविता, विद्यार्थ्यांना पाठविलेली पत्रे, कुटुंबियांकडून मिळालेली माहिती, विविध जाणकरांच्या मुलाखती इ. अप्रकाशित साधनांचा वापर केला आहे.

प्रस्तुत लघुशोध प्रबंध पाच प्रकरणात विभागण्यात आला आहे. पहिल्या प्रकरणात महाराष्ट्रातील १९ व्या शतकाच्या पूर्वार्धातील सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचे थोडक्यात वर्णन केले आहे. बॅ. पी. जी. पाटील यांचा जन्म, त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, प्राथमिक शिक्षण, कर्मवीर आण्णांची भेट, माध्यमिक शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण, स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, परदेशी उच्च शिक्षण, विवाह व कौटुंबिक जीवन याची माहिती दिली आहे.

दुसऱ्या प्रकरणात बॅ. पी. जी. पाटील यांचे रयत शिक्षण संस्थेतील योगदानाविषयी थोडक्यात माहिती दिलेली आहे. रयत शिक्षण संस्थेत ट्युटर म्हणून कार्य, वसतिगृहाचे रेक्टर, प्राचार्य पदावरील विश्वसनीय कार्य, रयत शिक्षण संस्थेचे सचिव, रयत शिक्षण संस्थेत कार्य करीत असताना पुणे विद्यापीठ (१९५७ – ६४) व शिवाजी विद्यापीठ (१९६४ – ७४) कार्यकारिणीवर कार्य इत्यादीचा समावेश प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणात बॅ. पी. जी. पाटील यांची शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती व कार्य यांची थोडक्यात माहिती दिलेली आहे. शिवाजी विद्यापीठाची स्थापना, शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदावरील कारकीर्द (२० जानेवारी १९७५ – १९७८)

विद्यापीठाचे प्रशासकीय कामकाज, बहि:शाल शिक्षण योजना व इतर कार्यक्रम याबाबतची माहिती या प्रकरणात दिलेली आहे.

चौथ्या प्रकरणात बॅ. पी. जी. पाटील यांचे शैक्षणिक विचार व सामाजिक कार्य याविषयी माहिती दिली आहे. बॅ. पी. जी. पाटील यांचे शैक्षणिक विचार, श्रमशक्ती व ज्ञानोपासना यांचा समन्वय, बलसंवर्धन व चारित्र्याची जपणूक, सामाजिक बांधिलकी, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य, राजकीय नेत्यांशी संबंध, सामाजिक कार्य – गरीब विद्यार्थ्यांना मदत, समाज प्रबोधन, सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांशी संबंध, स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतीकारकांशी संबंध, दानशूर स्वभाव याबाबतची माहिती प्रस्तुत प्रकरणात दिलेली आहे.

शेवटचे प्रकरण (पाचवे) मूल्यमापनाचे आहे. या संपूर्ण अभ्यासातून जे महत्त्वपूर्ण निष्कर्ष हाती आले आहेत. त्यांचे विश्लेषण व समाजातील काही संस्थांनी पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा जो गौरव केला आहे त्याचे थोडक्यात विवेचन या प्रकरणात केले आहे.

# ❖ अनुक्रमणिका ❖



| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | निवेदन | ii |
| | प्रमाणपत्र | iii |
| | ऋणनिर्देश | iv – vi |
| | प्रस्तावना | vii – ix |
| १. | बॅ. पी. जी. पाटील – प्रारंभीचे जीवन | १ – ३५ |
| २. | रयत शिक्षण संस्थेतील योगदान | ३६ – ६७ |
| ३. | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – कुलगुरू म्हणून कार्य | ६८ – १०३ |
| ४. | त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान व कार्य | १०४ – १३० |
| ५. | मूल्यमापन | १३१ – १४३ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | १४४ – १४९ |
| | परिशिष्ट्ये | |